महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,अमरावती

नगर विकास शाखा श्रेणी-१.

(कॅम्प अमरावती)

दूरध्वनी०७२१-२५५३९२०

ई मेल-dposjsry.amravati@gmail.com

क्र–कक्ष-२०/नविशा/कर व प्रशा/ आस्था/कावि/ ९६५/२०२१

दि. ११/०१/२०२१.

## जाहीर नोटीस

### धारणी नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०२०-२१

### " प्रारूप प्रभाग रचना , प्रभागदर्शक नकाशे व सदस्य पदांची आरक्षणाची निश्चिती यांची प्रसिद्धी व त्यावरील रहिवाश्यांच्या हरकती दाखल करणे "

( महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम , १९६५ चेकलम १० नुसार )

जिल्हाधिकारी, अमरावती या नोटीसद्वारे अमरावती जिल्हयातील धारणी नगरपंचायतींच्या क्षेत्रातील सर्व नागरिकांना जाहीर करीत आहे की, धारणी या नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूक-२०२०-२१ करिता प्रसिद्ध करावयाच्या प्रारूप प्रभाग रचनेचा मसुदा धारणी या नगरपंचायतीच्या, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती , तहसील कार्यालय धारणी येथील नोटीस बोर्डवर व जिल्हाधिकारी कार्यालयाचे वेबसाईटवर दिनांक ४/०१/२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. सदर मसुद्यामध्ये एकूण प्रभाग संख्या , निवडायच्या सभासदांची संख्या , अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती , व नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी (महिला आरक्षणासह) प्रभागाचे नाव , प्रभागाची व्याप्ती , चतु:सीमा , प्रभागदर्शक नकाशे व दिनांक ३०/१२/२०२० रोजी सोडतीद्वारे काढलेल्या आरक्षणाचा तपशील दर्शविण्यात आलेला असून तो नागरिकांना पहावयास कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

धारणी नगरपंचायतींच्या प्रारूप प्रभाग रचना , प्रभागदर्शक नकाशे व सदस्य पदांची आरक्षणाची निश्चितीबाबत ज्या कोणासही हरकती अथवा सूचना करावयाच्या असतील त्यांनी आपल्या सूचना व हरकती मुख्याधिकारी नगरपरिषद धारणी यांचे निवडणूक कार्यालय येथे ०४/०१/२०२१ (सोमवार) ते ११/०१/२०२१ (सोमवार) दुपारी ३.०० वा. पर्यंत लेखी स्वरुपात दाखल कराव्यात.

दि. ०४/०१/२०२१

( शैलेश नवाल )

जिल्हाधिकारी अमरावती